# सोयाबीन चोरी करणाऱ्या टोळीतील म्होरक्याला अटक

सकाळ टुडे - 22/07/2022

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड, ता. २१ (बातमीदार)** : सोयाबीन चोरी करणाऱ्या टोळीतील म्होरक्याला ९० हजार रुपयांच्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरूवारी (ता.२१) नांदेड रेल्वेस्थानकावरून अटक केली आहे. या टोळीतील दोघांना यापूर्वीच अटक केली असून, अद्यापही पाच आरोपी फरार आहेत.

पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना गुप्त माहिती मिळाली की, उमरी तसेच इस्लापूर पोलिस ठाण्यात नोंदविलेल्या गुन्ह्यातील फरार आरोपी श्रीकांत खंडु साळवे हा रेल्वेस्थानक नांदेड येथे आहे. त्यानुसार त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना स्थानकावर पाठविले. पथकाने श्रीकांत खंडु साळवे (वय २८, रा. डोरली, ता. हदगाव) यास पकडून विचारपुस केली असता सोयाबीन चोरल्याची कबुली त्याने दिली. तसेच करण करडेवाड, राजा उर्फ चिंग्या, शरद सूर्यवंशी, परमेश्वर गायकवाड, महेश गायकवाड, दशरथ उर्फ नामदेव देवकर, शंकर रॅपनवाड, दत्ता शिंदे या साथीदारांसोबत चोरी केल्याचे सांगितले.

यापूर्वी करण करडेवाड आणि राजा उर्फ चिंग्या या दोघांना अटक केलेली असून, उर्वरीत पाच आरोपी फरार आहेत. श्रीकांत खंडु साळवे याच्याकडून ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, पुढील तपासकामी त्याला पोलिस ठाणे उमरी यांच्या ताब्यात दिले असल्याची माहिती पोलिस निरीक्षक श्री. चिखलीकर यांनी दिली. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, गंगाधर कदम, [illegible] नवघरे, बालाजी तेलंग, अफजल पठाण, संजीव जिंकलवाड, शेख कलीम, हनुमान ठाकूर आदींनी केली.

# सोयाबीन चोरी के 2 आरोपी गिरफ्तार



**नांदेड़** | खेत से सोयाबीन चुराकर नांदेड़ बाजार में बेचने वाले गिरोह के दो आरोपियों को स्थानीय अपराध शाखा ने गिरफ्तार कर उनके पास से 90 हजार रुपए की सोयाबीन जब्त किया गया है। जिले में पिछले कुछ माह से सोयाबीन चोरी कर बाजार में बेचने की घटनाएं सामने आई है। इस संबंध में किसानों ने शिकायत की है कि उमरी, इस्लापुर और अन्य तहसीलों के विभिन्न पुलिस थानों की सीमा में सोयाबीन चोरी हुई थी। मगर हवा में उड रहे चोर असल में पुलिस को बेवकूफ बनाने में कामयाब रहे। स्थानीय अपराध शाखा की टीम ने अलग-अलग थाना सीमा में हुई चोरी की घटनाओं का पता लगाने के लिए अपने पंटर्स को अलग-अलग जगहों पर भेजा। स्थानीय अपराध शाखा के पुलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर को 21 जुलाई को सूचना मिली थी कि सोयाबीन चोरी के मामले में शामिल कुछ लोग नांदेड़ आए हैं। जानकारी के आधार पर उमरी और इस्लापुर में सोयाबीन चोरी मामले में वांछित श्रीकांत खांडू सालवे को पुलिस ने पकड लिया। उसके साथ राजा ऊर्फ चिंग्या को भी पुलिस ने गिरफ्तार उनके पास से उमरी के मामले में 90,000 रुपए का सोयाबीन जब्त किया। सोयाबीन चोरी मामले उसके साथ शरद सूर्यवंशी, परमेश्वर गायकवाड, महेश गायकवाड, दशरथ ऊर्फ नामदेव देवकर, शंकर रैपनवाड़ व दत्ता शिंदे भी शामिल हैं। लेकिन पुलिस अभी दो लोगों को ही गिरफ्तार कर पाई है।

22/07/2022

# तिसरा आरोपी गजाआड

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : उमरी, इस्लापूर येथे सोयाबीन चोरीच्या प्रकरणांमध्ये स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने २१ जुलै रोजी तिसऱ्या आरोपीला अटक केली असून, या आरोपीकडून ९० हजार रुपयांचे सोयाबीन जप्त केले आहे. विशेष म्हणजे आठ जणांची टोळी या पथकाने उघड केली आहे.

स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना आरोपीची माहिती मिळाली. आरोपी श्रीकांत खंडू साळवे (२८, रा.डोरली ता. हदगाव) हा नांदेड रेल्वे स्थानकावर आल्याचे समजताच पथकाने या आरोपीस ताब्यात घेतले. यापूर्वी करण करडेवाड आणि राजा उर्फ चिंग्या या दोघांना अटक केली होती. आता हा तिसरा आरोपी अटक झाला आहे. विशेष म्हणजे, करण करडेवाड, राजा उर्फ चिंग्या, शरद सूर्यवंशी, परमेश्वर गायकवाड, महेश गायकवाड, दशरथ उर्फ नामदेव देवकर, शंकर रॅपनवाड, दत्ता शिंदे यांनी सोयाबीन चोरी केल्याचे उघड झाले आहे. पाच आरोपी अद्याप फरार आहेत.

लोकमत नांदेड
22/07/2022